महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ 1/2, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

## सहायक सरकारी अभियोक्ता, सरकारी अभियोग संचालनालय, गट -अ

**धारिका क्रमांक : ९८६(१०)/१५६७/आठ/२०१५**

**जाहिरात क्रमांक : ७१/२०१५**

आयोगामार्फत शासनाच्या गृह विभागातील **सहायक सरकारी अभियोक्ता, सरकारी अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य गट—अ** या संवर्गातील **चालूरिक्त १६६** पदे व **अनुशेषाची ९** पदे अशा एकूण **१७५ पदांच्या** भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतेची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- १७५ (चालूरिक्त १६६ + अनुशेष ९)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २३+३▼ | १२+६▼ | ५ | ४ | ३ | ३ | १ | ३२ | ९२ | ८३ | १७५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १५+३▼ | ७+६▼ | ३ | २ | २ | २ | १ | २० | ६१ | ५४ | ११५ |
| अ) महिला (३०%) | ७ | ४ | २ | १ | १ | १ | - | १० | २६ | २५ | ५१ |
| ब) खेळाडू (५%) | १ | १ | - | १ | - | - | - | २ | ५ | ४ | ९ |
| क) अपंग (३%) | १७५ पैकी ६ पदे अपंग प्रवर्गाकरीत राखीव आहेत. त्यापैकी ३ पदे अंध/क्षीणदृष्टी करीता व ३ पदे चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु करीता राखीव | | | | | | | | | | |

▼- अनुशेषाची पदे

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एसपीपी २००४/अपंग आरक्षण/ प्र.क्र.५/ पोल-१०, दिनांक १० नोव्हेंबर २००४ अन्वये (अ) अंध/ क्षीणदृष्टी व (क) चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु [Locomotar disability or Cerebral palsy] अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत

**२.३** मुलाखतीसाठी पाचारण केलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडू बाबतची प्रमाणपत्रे क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

**३. वेतनश्रेणी -** १५,६०० — ३९,१०० + ग्रेड पे ५,४००/-

**४. पात्रताविषयक अटी -**

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वय**:- (१) **दिनांक १ नोव्हेंबर, २०१५** रोजी **कमाल वयोमर्यादा** ३३ वर्षे

(२) मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम,

(३) शासन आदेशानुसार माजी सैनिक , अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**४.३** शैक्षणिक अर्हता:- (१) Possess a degree in law ;

**४.४ अनुभव** - (१) Possess experience of working as an advocate in High Court or in a Court Subordinate thereto, for a period of not less than five years.

**[परंतुक १)** अनुसूचित जाती, बौद्ध धर्मांतरीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमातीच्या वर्गवारीतील उमेदवारांपैकी जाहिरातीत विहित केलेल्या अनुभवाचे उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास, अनुभव कालावधी शिथिल करण्याबाबत आयोगाकडून विचार करण्यात येईल.]

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेव्दारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या -** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क :**

८.१ अमागास - **रु.५१५/-** ८.२ मागासवर्गीय - **रु.३१५/-**

**"मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदांसाठीच्या आवश्यक अटी व शर्तीची पूर्तता (उदा. वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व अर्हता इत्यादी) केल्यासच अशा उमेदवारांची अराखीव पदांवर शिफारस करण्यात येईल."**

**९. अर्ज करण्याची पध्दत -**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ४ जुलै, २०१५ ते दिनांक २४ जुलै, २०१५** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

९.६ www.mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा.

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील.

(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईल पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहिल.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवारा अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२. **चाळणी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीचे वेळी सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा मुलाखत घेतली जाणार नाही.**

१३. चाळणी परीक्षा घेतल्यास **चाळणी परीक्षेचे व मुलाखतीचे गुण मिळून उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.**

१४. विहित पद्धतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१५. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २५ जुलै, २०१५** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**सु. सं. केसरकर**

ठिकाण : मुंबई

उपसचिव

**दिनांक : ४ जुलै, २०१५**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग